नि.क्र. ५ वरील आदेश.
(दि.१२.०२.२०२४)

१. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया सहिंता आदेश ३९ नियम १ व २ व सहकलम १५१ नुसार तात्पुरता मनाई हुकुमाकरिता दाखल केलेला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन की, मौजे पिंपळगाव चिलमखॉ, ता. देऊळगावराजा जि. बुलडाणा येथील शेतजमिन गट क्र. १९३, क्षेत्रफळ- १२ हे ०६ आर, आकार-२४ रू.पै., हिस्सा- ० हे ८० आर. वरील वर्णनाची शेतजमीन ही वादीच्या हिश्याची असून सदर मिळकतीस यापुढे "दावा मिळकत" असे संबोधलेले आहे.

३. वादी नं. १ व २ हे प्रतिवादी यांचे मुले असून वादी नं. ३ ह्या प्रतिवादीच्या पत्नी आहेत. दावा मिळकती ही प्रतिवादी यांनी मोहन सोनाजी वाघमारे यांच्याकडून २८.०६.१९ रोजी नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेतली व सदर दस्ता आधारे ७/१२ उताऱ्यास नोंद करून घेतली तेव्हापासून वादी व प्रतिवादी सदरची दावा मिळकत कसून आपला उदरनिर्वाह करित आहे. वादी नं. ३ यास प्रतिवादी हा विनाकारण दारू पिऊन त्रास देत असून मारहाण करित असे. त्यामुळे वादी नं. १ व २ हे वादी नं. ३ आईच्या माहेरी राहत असे. वादी हे कसेबसे रोजमजुरी करून आपला उदरनिर्वाह करित आहे. प्रतिवादींनी वादींना कोणतीही आर्थिक मदत केली नाही याउलट दारू पिऊन जिवानीशी मारून टाकण्याच्या धमक्या दिल्या व तिसरे लग्न करण्याची धमकी दिली. तसेच वादींना प्रतिवादींनी दावा मिळकत विकून टाकण्याची धमकी देखिल दिली. वादींना दावा मिळकतीशिवाय इतर कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. दि.०३.०१.२०२१ रोजी दूपारी ०२.०० वाजेच्या दरम्यान प्रतिवादींना वादीने स्वतः व नातेवाईकांमार्फत समजावून सांगितले असता प्रतिवादीने ऐकले नाही व दावा मिळकत विकून टाकण्याची धमकी दिली. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. करिता, प्रतिवादीने दावा मिळकतीची कोणत्याही प्रकारे तोंडी अगर लेखी हस्तांतरण करू नये म्हणून दाव्याचा निकाल होईतोपर्यत तात्पूरता मनाई आदेश प्रतिवादींविरूध्द करण्यात यावा. म्हणून अर्ज असे.

४. सदर अर्जास प्रतिवादीने संधी असूनही लेखी जबाब व म्हणणे दिले नाही. त्यामुळे दि.२५.०८.२२ रोजी प्रतिवादींविरुध्द लेखी जबाब व म्हणणे नाही असा हुकूम करण्यात आला आहे.

५. अर्ज व सोबतचे शपथपत्र व कागदपत्रे पाहिली वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर.बी. रामाणे यांचा प्रदिर्घ युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी यांचा वारंवार पूकारा केला असता ते गैरहजर. तसेच प्रतिवादींने कोणताही कायदेशिर मुद्यांबाबत युक्तीवाद संधी असूनदेखिल केला नाही. सदर अर्जाच्या

अनुषंगाने खालील मुद्दे विचारार्थ निघत असून त्याचे निष्कर्ष मी कारणमिमासेसह स्पष्ट केले आहे :-

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी त्यांना सकृतदर्शनी केस असल्याचे शाबीत करते काय ? | होकारार्थी... |
| २. | कोणाच्या बाजूने सोईचा व गैरसोईचा समतोल आहे ? | वादीच्या बाजुने... |
| ३. | तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास कोणास न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होईल ? | वादींचे... |
| ४. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे... |

का र ण मि मां सा

<u>मुद्दा क्रमाक १ ते ३ बाबत : -</u>

६. वरिल तिन्हीं मुद्दे एकमेकांशी संलग्न असून पुनरावृत्ती टाळण्याकरिता म्हणून ते एकत्रात चर्चेसाठी घेतलेले आहेत.

७. वादीने त्याच्या अर्जाच्या पुष्ट्यर्थ कागदपत्रे म्हणजे मौजे पिंपळगाव चिलमखॉ येथील गट नं. १९३ दि.०३.०१.२०२१ रोजीचा ७/१२ उतारा, मौजे जुमडा येथील गट नं. १०१ दि.२८.१२.२०२० रोजीचा ७/१२ उतारा, नोंदणीकृत खरेदी दस्त क्र. २८.०६.२०१९ रोजीचे दाखल केले आहे.

८. वस्तुतः वादीने सदरचा दावा हा कायम मनाई हूकूमासाठी दाखल केला असून वादीची निशाणी १ व निशाणी ५ कडील अर्जाची मागणी एकच आहे. वादीने निशाणी ४ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये ७/१२ उताऱ्यावर प्रतिवादींची नोंद ० हे. ८० आर. या मिळकतीस असल्याचे दर्शविते. तसेच, दाखल केलेल्या खरेदीदस्तामध्ये देखिल ८० आर. जमिनीचाच उल्लेख आहे. वादीचे दाव्यातील कथन की वादी नं. १ ते ३ व प्रतिवादी हे दावा मिळकत कसत असून त्यावर त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे ही बाब प्रतिवादीने लेखी जबाब अगर म्हणण्याद्वारे खंडण केली नाही. तसेच वादी नं. १ ते ३ यांचा दावा मिळकतीत कोणत्याही प्रकारचा कब्जा नाही असे देखिल सद्यस्थीतीला कोणताही पूरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे, वादीने दाव्यामध्ये आणि निशाणी ५ कडील अर्जामध्ये दावा मिळकत ही प्रतिवादीने कोणासही बेकायदेशिररित्या कायम विक्री करू नये आणि दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा तोंडी अगर लेखी हस्तांतराचा व्यवहार करू नये ऐवढीच मागणी तात्पूरत्या मनाई हुकूमाच्या अर्जाद्वारे वादीने केलेली आहे. वस्तुतः वादीने प्रतिवादीने दमदाटी केली असल्याबाबत अगर जिवे मारण्याची धमकी दिल्याबाबत त्याचबरोबर वादीने दावा दाखल करतेवेळी दि. ०३.०९.१९ रोजी दूपारी ०२.०० वाजता बेकायदेशिर कृत्य केले हे दाव्यातील

कथनांवरून स्पष्ट केले आहे. त्यामुळे, वादीने दाव्याद्वारे कायदेशिर मुद्दा उपस्थीत केला आहे आणि तो कायदेशिर मुद्दा दाव्यामध्ये पूरावा येऊन निर्णीत होणे अत्यंत आवश्यक आहे. तोपर्यंत दावा मिळकत कोणत्याही प्रकारे आणि कसल्याही पध्दतीने विल्हे, विक्री, तबदीली अगर गहाण, दान, बक्षीस इत्यादी प्रकारचा व्यवहार दावा मिळकतीमध्ये होऊ नये जेणेकरून दावा मिळकतीमध्ये तिराईत इसमाचे हक्क प्रस्तापित होतील आणि दाव्यामध्ये गूंतागूंतीची परिस्थीती निर्माण होण्याची दाट शक्यता असल्याचे वादीने सद्यस्थीतीला स्पष्ट केले आहे. त्यामुळे, प्रथमदर्शनी केस वादीने शाबीत केली आहे. तसेच न्यायाचा समतोल देखिल वादीच्या बाजूने आहे. तसेच, यदाकदाचित प्रतिवादीने दावा मिळकतीची कोणत्याही प्रकारे तबदीली केल्यास निश्चीतच वादींचे कधीही पैशाने न भरून येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीने सद्यस्थीतीला मुद्दा क्र. १ ते ३ हा शाबीत केला असल्याने मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्रमाक ४ बाबत :-</u>

९. मिळकतीमध्ये ज्याअर्थी वादीने तिला सकृतदर्शनी केस आहे, व प्रतिवादी हे दावा मिळकतीची तबदीली करण्याची भिती वादींना आहे. त्यामुळे प्रतिवादीने सदर दाव्याचा निकाल होईतोपर्यत दावा मिळकतीची कोणत्याही, कसल्याही प्रकारे, नोंद बिननोंद असे कोणतेही व्यवहार करू नयेत यासाठी म्हणून तात्पुरता मनाई हुकूम मिळणेस वादी पात्र आहे. त्याअर्थी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर वादीचे बाजुने नोंदविलेले असून मुद्दा क. ४ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे :-

आदेश

१. अर्ज नि.क्र. ५ मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीने स्वतः अगर इतरांमार्फत दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करू नये म्हणजे दावा मिळकत कोणासही दान, गहाण, हस्तांतरण, ताबेइसारपावती, खरेदीखत, इतर कोणत्याही दस्ताद्वारे तोंडी अथवा लेखी हस्तांतरण करू नये असा तात्पूरता मनाई आदेश या दाव्याचा निकाल लागेतोपर्यंत देण्यात येत आहे.

३. खर्चाबाबत आदेश दाव्याच्या अंतिम चौकशी वेळी ठरविण्यात येतील.

स्वा/-

दि.१२.०२.२०२४.

शैलेश यु. कंठे
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
देऊळगावराजा.

रुपेश अशोक दांडगे,
लघुलेखक.